# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**<u>(घन कचरा व्यवस्थापन, आर/मध्य विभाग.)</u>**

सहा.अभि./आर-मध्य/३७४७/घ.क.व्य. दि.२४.०८.२०२४

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात</u>

**विषय** :-आर/मध्य विभागात गणेशोत्सव काळात विसर्जन स्थळांवर व विविध विसर्जन मार्गिकांवर स्वच्छतेच्या सेवा पुरविण्यासाठी अशासकिय संस्थांची नियुक्ती करणेबाबत.

आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, गणेशोत्सव काळात विसर्जन स्थळांवर व विविध विसर्जन मार्गिकांवर स्वच्छतेच्या सेवा पुरविण्यासाठी विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक कामगार सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकिय संस्था इ. संस्थाकडुन` त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

अर्जाचा नमुना आर/मध्य विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. 330/- अधिक 18 टक्के वस्तू व सेवा कर रोख स्वरुपात भरलेनंतर दि.26/08/2024 ते दि.02/09/2024, सकाळी 10.30 ते दुपारी 01.30 यावेळेत विकत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप आर/मध्य विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. संस्थेने आर/मध्य विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.02/09/2024 (दुपारी 03.00 वाजेपर्यंत).

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत. सदर जाहीरातीच्या अनुषंगाने अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकारी सहाय्यक आयुक्त, आर/मध्य यांना असतील व ते अर्ज करणा-या संस्थेस बंधनकारक असतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)**
**आर/मध्य विभाग**